...स्थान क...

...उपयुक्त.

# ...क्षरमार्गप्रदीप.

[ र्‍हस्व, दीर्घ व अनुस्वार यांच्या माहितीसह. ]



लेखक,

...ळकर्णी, नूलकर.

...त ३ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ठाणे

दा. क्र. 30...

# दोन श…

मी करवीर येथील 'श्री शाहूस्कूल' मध्यें निरनिरा…
काम करीत असतां, जोडाक्षरें सोप्या रीतीनें शिकविण्यासाठीं …
तयार केलीं; त्यावरून 'जोडाक्षरमार्गप्रदीप' हें पुस्तक लिहि…

सदर पुस्तकाची उपयुक्तता मे०रा० सोहनी, पेन्शनर ए० इ…
कोल्हापूर, यांच्या प्रस्तावनेवरून व शेवटीं जोडलेल्या अभिप्रायां…
सहज कळून येईल.

ही पुस्तकरूपी जनसेवा घडून येण्यास 'श्रीमंत हिंमतबहाद्दरसाहे…
यांनीं उदारपणें दिलेली आर्थिक मदत विशेष कारणीभूत झालेली आहे…
सदर मदतीबद्दल मी श्रीमंतांचा सदैव ऋणि आहे. त्याचप्रमाणें, श्रीमं…
काकासाहेब कागलकर व श्रीमंत पंतअमात्य संस्थान बावडा यांनी…
दिलेल्या मदतीबद्दल उभयतांचाही मी अंशतः ऋणि आहें.

सदर पुस्तकाची हस्तलिखित प्रत ज्या विद्वान् व अधिकारी ग…
स्थांनी तपासण्यांत आपला अमोलिक वेळ खर्चिला त्यांचा मी…
आभारी आहें. तसेंच मे० रा० सोहनी यांनीं पुस्तक परीक्षण …
मोठ्या आनंदानें प्रस्तावना लिहून दिली. याबद्दल त्यांचाही …
आभारी आहें.

कांहीं मित्रांच्या सूचनेवरून ऱ्हस्व, दीर्घ व अनुस्वार यां…
पण अत्यंत उपयुक्त माहिती पुस्तकाच्या शेवटीं जोडली …
चांगलाच उपयोग होईल अशी उमेद आहे.

ही अल्पशी कृति ज्या दयाघन प्रभूनें करविली …
होऊन, हे दोन शब्द पुरे करितों.

विजयादशमी
शके १८४८
कोल्हापूर

संस्थान करवीर व आश्रित येथील
शाळांकरितां मंजूर झालेलें

**प्राथमिक शाळांस अत्यंत उपयुक्त.**

# जोडाक्षरमार्गप्रदीप.

[ऱ्हस्व, दीर्घ व अनुस्वार यांच्या माहितीसह.]


लेखक व प्रकाशक,

**दामोदर दत्तात्रय कुलकर्णी, नूलकर.**



मुद्रकः— वासुदेव नारायण ठकार, श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

आवृत्ति पहिली. प्रती २०००.



[ सर्व हक्क स्वाधीन. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दा. क्र. 3029



सन १९२६.

किंमत ३ आणे.

# प्रस्तावना.

मराठी भाषेंत जोडाक्षरें फार आहेत. संस्कृत भाषेंतून आलेलीं व शुद्ध प्राकृत भाषेंतील, अशीं दोन प्रकारचीं जोडाक्षरें वारंवार भाषेंत येतात, तीं स्वतंत्रपणें न शिकवितां वाचनांत येतील तशीं मुलांना समजावून द्यावयाचीं, अशी पद्धत शाळाखात्यांत अलीकडे झाली आहे.

शिक्षकांनीं फारच लक्ष दिल्याशिवाय त्या पद्धतीचा खरा उपयोग होणें शक्य नाहीं. सामान्यत्वें पाहिलें तर मुलांना हल्लीं पूर्वींप्रमाणें जोडाक्षरें लिहावयास येत नाहींत व तीं वाचावयास येण्याचें त्याच मानानें कमी झालेलें आहे. केव्हां केव्हां वरिष्ठ प्रकारच्या ईयत्तांतील मुलांचे जोडाक्षरांचे उच्चार ऐकवत नाहींत.

अशी स्थिति असल्यानें जोडाक्षरें सोप्या रीतीनें लिहितां व उच्चारितां येण्यासाठीं हें पुस्तक मि. कुलकर्णी यांनीं रचून तयार केलें आहे.

शाळाखात्याकडून या पुस्तकास आश्रय मिळाला तर दुसरे ईयत्तेचे विद्यार्थ्यांकडून या पुस्तकांतील धड्यांचें वाचन व लेखन करविण्याची तजवीज व्हावी; व या गोष्टीस आरंभ होईतों मुलांच्या पालकांनीं आपण किंवा घरच्या शिक्षकांकरवीं योग्यवेळीं घरगुती तऱ्हेनें या पुस्तकाचा उपयोग मुलांस होईल असें करावें. म्हणजे या सामान्य गोष्टीचा पुढें जन्मभर त्रास पडणार नाहीं.

तारीख
२१।८।१९२६
कोल्हापूर.

K. G. SOHONI.
पेनशनर,
ए. इन्स्पेक्टर, कोल्हापूर.

# सामान्य माहिती.

[ ह्या माहितीचा उपयोग शिक्षकांनीं जरूरीप्रमाणें करावा. ]

## स्वर.

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ[1] ऌ ॡ[2] ए ऐ ओ औ अं[3] अः

## * व्यंजनें.

क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ ण त थ
द ध न प फ ब भ म य र ल व श ष स ह ळ क्ष ज्ञ[4]

---

स्वरांचा उच्चार पूर्ण होतो. आणि व्यंजनांचा उच्चार अपूर्ण होतो. व्यंजनांचा उच्चार पूर्ण करण्यासाठीं त्यांत स्वर मिळवावे लागतात.

* लहान मुलांना व्यंजनें शिकवितांना उच्चाराच्या व लिहिण्याच्या सोपेपणाकरितां तीं अकारांतच लिहून दाखवितात. केवळ व्यंजनांचाच उल्लेख करावयाचा असतां तीं क्, ख्, ग्, प्, अशीं लिहून दाखवितात.

अशा व्यंजनांत कोणताही स्वर मिळविला असतां त्याची (व्यंजनाची) पाय मोडकेपणाची खूण नाहींशी होते, व त्यास स्वराची दुसरी खूण जोडली जाते.

---

१ ऋ ॠ ऌ बद्दल धडा १ मध्यें पहा.

२ ऌ ह्या स्वरास दीर्घत्व नाहीं.

३ अं आणि अः ह्या संबंधीं पृ. २ मध्यें पहा.

४ क्ष आणि ज्ञ हीं संयुक्त व्यंजनें अगर जोडाक्षरें होत. क् आणि ष मिळून क्ष होतो. ज् आणि ञ मिळून ज्ञ होतो. ( हीं जोडाक्षरें त्यांच्या उच्चाराप्रमाणें क्ष, ज्ञ किंवा द्न्य अशीं न काढतां निराळ्या रीतीनें काढतात ह्यामुळें हीं जोडाक्षरें आहेत असें सहज दिसून येत नाहीं.)

आ. क.

व्यंजन-क् क् क् क् क् क् क् क् क् क् क् क्
स्वर– अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः
खुणा–✻ ा, ि, ी, ु, ू, े, ै, ो, ौ, ं, ः,
अक्षरें–क, का, कि, की, कु, कू, के, कै, को, कौ, कं, कः

**कोणत्याही स्वरास व स्वर जोडलेल्या व्यंजनास अक्षर म्हणतात.**

* व्यंजनांत 'अ' हा स्वर मिळविल्याबद्दल कोणतीही खूण करावी लागत नाहीं; फक्त व्यंजनाची खूण नाहींशी होते.

अं — [ ं ] अनुस्वाराचा उच्चार स्वतंत्रपणें करितां येत नाहीं, म्हणून तो कोणत्या तरी स्वरास विशेषतः 'अ' ह्या स्वरास जोडून लिहितात. जसें:– अं.

अः —[ ः ] अनुस्वाराप्रमाणें विसर्गाचा उच्चारही स्वतंत्रपणें करितां येत नसल्यामुळें तोही 'अ' ह्या स्वरास जोडून लिहितात. जसें:– अः

टीपः— अनुस्वार आणि विसर्ग हे कोणत्याही स्वरास आणि स्वर जोडलेल्या व्यंजनास जोडून लिहितां येतात.

अनुस्वारयुक्त शब्दः— अंजीर, इंद्र, उंदीर, ओंजळ, औंध, कंठी, खांब, चिंच, कुंभार, भेंडी, सैंधव, गोंधळ, सौंदर्य इ.

विसर्गयुक्त शब्दः— कः पदार्थ, अंतःकरण, दुःख, तेजःपुंज, अधःपात, इतःपर, मनःपूर्वक, विष्णवेनमः, यःकश्चित्, उषःकाल.

च, छ, ज आणि झ, ह्यांचे दोन प्रकारचे उच्चार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत, एक तालव्य आणि दुसरा दंततालव्य.

रोखी ७८३



**तालव्य** ह्मणजे च, छ, ज आणि झ ह्यांना साधारणतः **य** जोडल्यासारखा होणारा उच्चार जसें:— चक्र, चार, चित्र, चीट, चुप्, चेला, चैन, बेचोक, चंपा, छत्र, छाती, छिद्र, छू, जन्म, राजाराम, जिना, जीव, जेव, जंगल, तुझी, झेल, झंगट इ०

**टीप**:— ह्या प्रकारांतील अकारांत व आकारांत अक्षरें चुकीनें अनुक्रमें य आणि या जोडून लिहितात; उदाहरणार्थ— च्यक्र, ( चक्र ). ज्यन्म ( जन्म ). राज्यापूर ( राजापूर ) इ०.— तिकडे शिक्षकांनीं लक्ष ठेवून वेळींच सुधारणा करावी.

**दंत तालव्य** ह्मणजे दांत व त्यांवरची बाजू ह्या ठिकाणीं जिभेचा स्पर्श होऊन निघणारा उच्चार. जसें:— चवरी, चाकर, चुना, चूक, चोरटा, चौदा, चांदोबा, जमा, जागा, जुना, जूट, जेव्हां, जोर, झगा, झाड, झुरळ, झोका, झांज इ०

**श**— श हा वर्ण तीन तऱ्हांनीं काढतात; **श, श** आणि **श**. पहिल्या दोन्ही तऱ्हा स्वतंत्रपणें सारख्याच प्रचारांत आहेत. शेवटची तऱ्हा श्री, श्व, श्न इ. जोडाक्षरांत आढळते व क्वचित् **शृंग, शुभ, शुद्ध ( शुक्ल )** इ० थोड्याशा शब्दांत स्वतंत्रपणें कधीं कधीं दिसून येते.

**ङ, ञ, ण** आणि **ळ** ह्या अक्षरांनीं आरंभिलेले शब्द मराठींत नाहींत.

**संसार**, संरक्षण, संस्कृत, संहार, सिंह, संशय, हंस, इ० शब्द चुकीनें, सौंसार–संवसार; सौंहार–संव्हार; सिंव्ह, हौंस; सौंशय–संवशय इ० असें लिहितात तिकडेही शिक्षकांनीं लक्ष ठेवून चुका दुरुस्त करवाव्या.

**टीप**.— शब्द किंवा शुद्धलेखन तपासून झाल्यावर विद्यार्थ्यांकडून चुका दुरुस्त करून घेणें विशेष अगत्याचें आहे.

## धडा पहिला.

## ऋ, ॠ आणि ऌ

हे स्वर जोडलेलीं अक्षरें कित्येकांस जोडाक्षरांप्रमाणें वाटतात, पण तीं जोडाक्षरें नव्हत. अक्षरेंच होत. कारण, अक्षर होण्यास एक व्यंजन आणि एक स्वर लागतो; पण जोडाक्षर होण्यास निदान दोन व्यंजनें आणि एक स्वर लागतो.

ऋ हा स्वर व्यंजनाचे खालीं ृ असा जोडतात. जसें:—

क् + ऋ = कृ = कृपाळू.

ग् + ऋ = गृ = गृह

घ् + ऋ = घृ = घृत.

ॠ हा स्वर व्यंजनाचे खालीं ॄ असा जोडतात जसें:—

त् + ॠ = तॄ = मातॄण.

ऌ हा स्वर व्यंजनाचे खालीं किंवा पुढें जोडतात. जसें:- कॢ क्ल.

**वाचाः— दृ ( दृ ) धृ, नृ, पृ, फृ, बृ, भृ, मृ, वृ, शृ, (शृ) सृ, हृ. भृंग, मृदंग, वृकोदर, आकृति, शृंगेरी, हृदय. गृहिणी, नृपति, वृक्ष, कृतज्ञता**

**१ देव हा कृपेचा सागर आहे.**

**२ रामायणकाळांत शृंग या नांवाचे ऋषि होऊन गेले.**

**३ रामानें पितृवचनाकरितां वनवासाचें दुःख भोगिलें.**

**४ शहामृगाची मान लांब आणि बारीक असते.**

**५ अनृत ( खोटें ) भाषण करूं नये.**

---

टीपः— र ला ऋ हा स्वर जोडतांना र ची ॅ रेफ होते. व ऋ जशाचा तसा राहतो. जसें:- नैरृत्य.

* एका अक्षरास दुसरें अक्षर जोडून लिहिलें म्हणजे त्यास जोडाक्षर म्हणावें. जोडाक्षरांतील अक्षरांचा उच्चार ( लिहिलेल्या क्रमानें ) एकदम करावा.

## धडा दुसरा

## क्

प्रथम क् हें व्यंजन अर्धे म्हणजे क असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें जसें:—

क् + त = क्त. क्त. भक्त.

क् + य = क्य .... वाक्य

क् + ल = क्ल. क्ल. शुक्ल

वाचा:- आक्टोबर, युक्ति, क्लेश, ओक्साबोक्शीं, वक्तशीर, रुक्मांगद, क्वचित्, पक्व, रुक्मिणी.

१ आपण देवाची भक्ति करावी.

२ पडक्या घरांत राहणें धोक्याचें असतें.

३ चांदोबा शुक्लपक्षांत थोडाथोडा वाढत जातो.

४ आक्टोबर महिना एकतीस दिवसांचा असतो.

५ संघशक्तीनें मोठमोठीं कामें करितां येतात.

६ हिंवतापावर क्विनाइन हें चांगलें औषध आहे.

७ युक्तीनें शक्तीपेक्षां अधिक काम करतां येतें.

---

* ही व्याख्या केवळ लहान मुलाचे समजुतीकरितां दिली आहे, व्याकरणदृष्ट्या जोडाक्षराची व्याख्या अशी आहे:- दोन अथवा अधिक व्यंजनांत स्वर मिळविला म्हणजे त्यास जोडाक्षर म्हणावें.

जोडाक्षराचे आरंभीं व्यंजनें असतात, लहान मुलांस शिकवितांना त्या ठिकाणीं अक्षर म्हटल्यास चालेल तसेंच + चिन्हाचे ठिकाणीं ला प्रत्ययाचा उपयोग केल्यास हरकत नाहीं उदाहरणार्थ क् + त ह्या ठिकाणी क् ला त = क्त. असें म्हणावें.

## धडा तिसरा.

### ख्

प्रथम ख् हें व्यंजन अर्धे ह्मणजे ख असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

ख् + य = ख्य. संख्या.

### ग्

प्रथम ग् हें व्यंजन अर्धे ह्मणजे – ग – असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

ग् + ध = ग्ध .... दुग्ध.

ग् + न = ग्न ग्न. लग्न.

ग् + य = ग्य .... मुंग्या.

ग् + ल = ग्ल .... गडहिंग्लज.

वाचाः– मुख्य, दुग्ध, युग्म, वाग्भट, ऋग्वेद.

१ मुंबई इलाख्याचे मुख्य चार भाग आहेत.

२ दुधाला दुग्ध हें दुसरें नांव आहे

३ तानाजीनें मुलाचें लग्न थांबवून सिंहगडावर चाल केली. केवढी ही देशभक्ति !

४ मुंग्या नेहमीं काम करितात.

५ गडहिंग्लज येथें रविवारीं बाजार भरतो.

६ ऋग्वेद हा पहिला वेद होय.

७ तांबडा, निळा आणि पिवळा असे मुख्य तीन रंग आहेत.

## धडा चौथा.

### घ्

प्रथम घ् हें व्यंजन अर्धें म्हणजे – घ – असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:–

घ् + न = घ्न. घ्न विघ्न.

घ् + य = घ्य. वाघ्या.

### ङ्.

प्रथम ङ् हें व्यंजन – ङ – असें काढून त्याखालीं किंवा पुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:–

ङ् + म = ङ्म. वाङ्मय.

### च्.

प्रथम च् हें व्यंजन अर्धें ह्मणजे – च – असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

च + छ = च्छ. इच्छा.

च + य = च्य. देवाच्या.

**वाचा:-कच्छ, कृतघ्न, रामाच्या, पराङ्मुख, उच्छृंखल.**

**१ लग्नाचेकामीं विघ्न आणूं नये.**

**२ खंडोबाला जो मुलगा वाहतात तो वाघ्या.**

**३ जशी इच्छा करावी तसें फळ मिळतें.**

**४ आईबापांच्या व गुरूच्या आज्ञा पाळा.**

**५ कच्छ मधील घोडे व उंट चांगले असतात.**

**६ मुलांमुलींनीं वेळच्यावेळीं शाळेंत जावें.**

---

केवळ छ् ह्या व्यंजनास जोडून झालेलीं जोडाक्षरें नाहींत.

## धडा पाचवा.

### ज्

प्रथम ज् हें व्यंजन अर्धें ह्मणजे – ज – असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें: —

ज् + य = ज्य. राज्य.

ज् + व = ज्व. ज्वारी.

### झ्

प्रथम झ् हें व्यंजन अर्धें ह्मणजे – झ – असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें: –

झ् + य = झ्य. तुझ्या.

वाचा:— भाज्य, ज्वर, माझ्या, ज्वालामुखी,

१ श्रीशिवाजी महाराजांनीं मराठी राज्याचा पाया घातला.

२ ज्वारीचें पीक देशांत फार होतें.

३ ज्वर आलेला माणूस अशक्त होतो.

४ तुझ्यापेक्षां माझ्याजवळ चांगली शाई आहे-

५ ताज्या भाज्या खाणें हितावह आहे.

६ बाबा, माझ्यानें खोटें बोलवत नाहीं.

### ञ्

ञ् ह्या व्यंजनापासून झालेलीं जोडाक्षरें नाहींत.

---

प्रश्न:– १ क, ग, घ हीं अक्षरें अर्धीं काढा. २ क्म हें जोडाक्षर कसें काढावें? ३ जोडाक्षर म्हणजे काय? ४ क्र, प्र, क्त, ल्य हीं काय आहेत?

धडा सहावा.

## ट् ठ् ड् आणि ढ्

वरील व्यंजनांपैकीं कोणतेंही व्यंजन पाय न मोडतां लिहून त्यापुढें 'य' हें अक्षर–'य'–असें जोडावें आणि इतर अक्षरें खालीं जोडावीं. जसें:–

ट् + य = ट्य. पाट्या.

ठ् + य = ठ्य. मोठ्या.

ड् + य = ड्य. गाड्या.

ढ् + य = ढ्य. ओढ्यावर

ट् + व = ट्व. खट्वांग.

ड् + ग = ड्ग. खड्ग.

ट् + क = ट्क. षट्कोण.

वाचा.— गोट्या. काठ्या. छड्या मेंढ्या. घड्याळ.

१ आट्यापाट्यांचा खेळ सपाट जमिनीवर खेळतां येतो

२ मुंबईंत मोठमोठ्या इमारती खूपच आहेत.

३ कांहीं ओढ्यांवर लांकडी पूल बांधितात.

४ तलवारीला खड्ग हें दुसरें नांव आहे.

५ बापाचा तो बोध पुंड्याच्या मनावर चांगला ठसला.

६ हिरड्याच्या काढ्यांत हिराकस घातला असतां काळा रंग तयार होतो.

---

टीप – खड्ग, षट्कोण इ. शब्दांतील जोडाक्षरें अशीही लिहितात. खड्ग. षट्कोण षट्पाद, षड्रिपु इ. ह्याप्रमाणें इतर जोडाक्षरेंही कोठें कोठें अशीच लिहितात–जगद्गुरु सत्कर्म, वाङ्मय, भगवद्गीता. इ०

## धडा सातवा.

### कोणत्याही व्यंजनास र जोडणें *

र हें अक्षर कोणत्याही व्यंजनास जसेंच्या तसें जोडत नाहींत.[1] तें पुढील दोन खुणांनीं जोडतात. एक ‐ अशी व दुसरी ^ अशी.

ज्या व्यंजनांत उभी रेघ असते त्यास र हें अक्षर पहिल्या [‐] खुणेनें जोडावें. जसें:—

क् + र = क्र. क्र. पराक्रम.

ग् + र = ग्र. .... ग्राम.

त् + र = त्र. त्र. रात्र.

ज् + र = ज्र. वज्र. द् + र = द्र. चंद्र.

ज्या व्यंजनांत उभी रेघ नसते त्यास र हें अक्षर दुसऱ्या खुणेनें [ ^ ] जोडावें. जसें:—ट्र, ड्र, ड्र, ठ्र, ह्र ह्र इ०

**वाचा:—प्रसाद, फ्रेंच, ब्रीद, श्रम, नम्र, व्रत, (श्रम) सहस्र, कंट्रोल, षड्रिपु, ह्रास.**

**१ मी आपलें सामान ट्रंकेंत ठेवितों**

**२ साधु होण्यास षड्रिपु जिंकावे लागतात.**

**३ कधीं कधीं चंद्राला खग्रास ग्रहण लागतें.**

**५ श्रमावांचून विश्रांतीचें सुख कळत नाहीं.**

**६ शंभर सहस्रांचा (हजारांचा) एक लक्ष होतो.**

**७ प्राणिमात्रावर दया करावी.**

**८ आळस हा आपला शत्रु होय.**

---

[1] अलीकडे नवीन तऱ्हा म्हणून कोठें कोठें र हें अक्षर जसेंच्या तसें जोडतात. जसें विक्रम, त्रास, ध्रुव, प्राण. *[क्रम सोडून हा धडा येथें मुद्दाम दिला आहे]

धडा आठवा.

## ण् त् आणि थ्.

संकी. ९८३

हीं व्यंजनें अनुक्रमें अर्धीं म्हणजे अशीं [ ण, त आणि थ ] काढून त्यापुढें दुसरीं अक्षरें जोडावीं. जसें:—

ण् + य = ण्य. पुण्य. ण् + व = ण्व. कण्व.

त् + क = त्क. सत्कार.

त् + न = त्न. यत्न.

त् + प = त्प. तत्पर.

त् + य = त्य. तात्या. त् + स = त्स. वत्सला. ❀

* त्स चा उच्चार ( दंततालव्य ) छ प्रमाणें होतो.

थ् + य = थ्य. काथ्या. थ् + व = थ्व. पृथ्वी.

वाचाः—पाण्याचा, षण्मास, आत्माराम. संवत्सर, मिथ्या, सत्वर, तात्या, रत्नागिरी, सत्पुरुष, तृषाक्रांत. प्रयत्न, सत्कृत्य, चमत्कार, फण्या.

१ पुण्यापासून ३ मैलांवर चतुरशिंगीचें देऊळ आहे.

२ प्राचीनकाळीं कण्व नांवाचे ऋषि होऊन गेले.

३ अतिथींचा सत्कार करावा.

४ फिरून यत्न करून पहा.

५ धावत्या गाडींतून उडी मारूं नये.

६ काथ्याचे दोर पाण्यांत बरेच दिवस टिकतात.

७ आपापलें काम करण्यांत तत्पर असा.

८ पृथ्वी गोलाकार आहे.

## धडा नववा.

### द्

द् ह्या व्यंजनास म आणि य हीं अक्षरें खालीं जोडतात; त्यावेळीं तीं ( म आणि य ) अशीं दिसतात जसें:—

द् + म = द्म. पद्मावती. द् + य = द्य. विद्या.

कांहीं अक्षरें द च्या खालीं तिरपीं जोडतात जसें:—

द् + व = द्व. द्वारका. द् + ध = द्ध. युद्ध.

द् + ब = द्ब. सद्बुद्धि. द् + भ = द्भ. सद्भाव.

द् + ग = द्ग भगवद्गीता.

[ हीं जोडाक्षरें जलद लिहितां यावीं म्हणून जोडावयाची अक्षरें दच्या गाठीमागें अर्धीही जोडतात. ]

### ध्.

प्रथम ध् हें व्यंजन अर्धें म्हणजे ६ असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

ध् + य = ध्य. ध्यान. ध् + व = ध्व. ध्वनि.

१ करवीर शहरीं पद्माळें तलावानजीक पद्मावतीचें देवालय आहे.

२ आजचें काम उद्यांवर टाकूं नका.

३ विद्वानाला कोठेंही मान मिळतो.

४ तुकाराम महाराज हे मोठे भगवद्भक्त होते.

५ असाध्य कामें साध्य होण्यास सतत उद्योग केला पाहिजे.

६ आषाढ शुद्ध एकादशीस पंढरपूर येथें यात्रा भरते.

घडा द्यावा.

## न्, प् आणि फ्

हीं व्यंजनें अनुक्रमें अर्धीं म्हणजे अशीं **न**, **प** आणि **फ** काढून त्यापुढें दुसरीं अक्षरें जोडावीं. जसें:-

न + म = न्म. जन्म.

न् + ह = न्ह. उन्हाळा.

प् + त = प्त. प्त. आप्त.

प् + ल = प्ल. प्ल. प्लासी.

प् + य = प्य. टोप्या.

फ् + य = फ्य. नफ्याचा.

वाचा:- सन्मान, सोन्याचा, न्हाणी, सोप्यावर, अन्वय, समाप्त, नृत्य, पेन्सील, प्लासी, अप्सरा.

१ चैत्र शुद्ध नवमीस रामजन्माचा उत्सव होतो.

२ कोणत्याही संख्येस शून्यानें गुणिलें तर गुणाकार शून्य येतो.

३ राजापूर येथें उन्हाळीं (ऊन पाण्याचे झरे) आहेत.

४ रथसप्तमीपासून दिवस मोठा होत जातो.

५ सप्टेंबर हा इंग्रजींतील नववा महिना होय.

६ प्लेग हा अत्यंत घातक रोग सन 'अठराशें शाण्णव' सालीं मुंबईंत उद्भवला.

७ पौष महिन्यांत संक्रांतीचा सण येतो.

धडा अकरावा
### ब्, भ्, म् आणि य्.

हीं व्यंजनें अनुक्रमें अर्धीं म्हणजे ब, भ, म आणि य अशीं काढून त्यापुढें दुसरीं अक्षरें जोडावीं. जसें:-

ब् + ज = ब्ज. अब्ज.

ब् + द् = ब्द्. शब्द्.

ब् + ध = ब्ध. अब्धि.

ब् + य = ब्य. तांब्या.

भ् + य = भ्य. अभ्यास.

म् + य = म्य. दशम्या.

म् + ह = म्ह. म्हणून.

य् + व = य्व. वाय्वावरण.

**वाचा:—अब्धि, सभ्य, म्यान, आम्ही, म्लेंच्छ.**

**१ शंभर कोटींचा एक अब्ज होतो.**

**२ मराठी भाषेंत शब्दांच्या आठ जाती आहेत.**

**३ आंब्यांच्या बागेस आंबराई म्हणतात.**

**४ अभ्यासाचे वेळीं अभ्यासच करा.**

**५ शिपायानें आपली तरवार म्यानांत ठेविली.**

**६ हवा हालूं लागली म्हणजे तिला वारा म्हणतात.**

**७ सोनें थोडें सांपडतें, म्हणून तें महाग विकतें.**

## धडा बारावा.

# र्

र् ह्या व्यंजनास जें अक्षर जोडावयाचें त्यावर र्‌ बद्दल ॱ अशी खूण करितात. ह्या खुणेस 'रेफ' म्हणतात.

वाचतांना वरच्या र् चा उच्चार आधीं करून मग खालील अक्षराचा उच्चार करावा. जसें:—

**र् + क = र्क. अर्क.  र् + म = र्म. धर्म.**

**र् + व = र्व. गर्व  र् + ष = र्ष. वर्ष.**

झारा, सुरी, खोरें, इ० अशा प्रकारच्या शब्दांचें सामान्यरूप होतांना रा-री-रें इ० चें रूप ऱ्य असें होतें. जसें:—

**झाऱ्यानें, खोऱ्याचा, सुऱ्यांनीं, पुऱ्या, शेजाऱ्याचा इ०**

पुढील शब्दांतील र नेहमीं ऱ असाच असतो:—

**कऱ्हाड, वऱ्हाड, बिऱ्हाड, कुऱ्हाड, तऱ्हा, बऱ्हाणपूर इ.**

**वाचा:—मूर्ख, वर्ग, दीर्घोद्योग, खर्च, मूर्च्छा, कर्ज. कोर्ट, कार्ड, पूर्ण, वर्तन, अर्थ, गर्दी, अर्धा, सर्प, बर्फ, सूर्य.**

**१ संभाजी महाराजांनीं धर्माकरितां आपल्या प्राणाचीही पर्वा केली नाहीं.**

**२ शालिवाहनशकाचा वर्षारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो.**

**३ फार मोठ्या व उंच डोंगरास पर्वत म्हणतात.**

**४ दुसऱ्यावर अवलंबून राहाणें बरें नाहीं.**

**५ कऱ्हाड येथें आगपेट्यांचा कारखाना आहे.**

**६ नेहमीं दुसऱ्याचे उपयोगी पडावें.**

## धडा तेरावा.

## ल् आणि व्

हीं व्यंजनें अनुक्रमें अर्धी ह्मणजे ल आणि व अशीं काढून त्यापुढें दुसरीं अक्षरें जोडावीं जसें: —

ल् + प = ल्प, कल्पना. ल् + ग = ल्ग, फाल्गुन.
ल् + म = ल्म, वाल्मिक. ल् + य = ल्य, चवल्या.
ल् + ह = ल्ह, जिल्हा.
व् + य = व्य, व्यापार. व् + ह = व्ह, देव्हारा.

वाचाः— वल्कल, अल्प, वल्गना, बिल्व, व्याज, जेव्हां, व्हिक्टोरिया, गव्हर्नर, वृद्ध, कोल्हा, कल्याण.

१ रामनामानें वाल्याकोळी वाल्मिक ऋषि झाला.
२ रंगपंचमीचा सण फाल्गुनांत येतो.
३ चवल्या, पावल्या, अधेल्या आणि रुपाया हीं नाणीं रुप्याचीं आहेत.
४ नियमित व्यायाम करणें हितावह आहे.
५ जेव्हांचें काम तेव्हां करावें.
६ इसवी सनाचा वर्षारंभ जानेवारीच्या पहिल्या तारखेस होतो.
७ प्रल्हादाच्या भक्तीसाठीं देवानें नृसिंहावतार घेतला
८ आगगाडीची कल्पना वॉट साहेबांनीं काढिली.
९ आपल्याकडील बहुतेक व्यापारी विक्रम संवत् पाळतात.

## धडा चौदावा.

### श्

प्रथम श् हें व्यंजन अर्धें म्हणजे श्‍ असें किंवा श्‍ असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें जसें:--

श् + व = श्व. श्व. ईश्वर. (ईश्वर)

श् + न = श्न. श्न. प्रश्न

श् + ल = श्ल. श्ल. श्लोक.

श् + य = श्य. .... अवश्य.

श् + च = श्च. .... पश्चिम.

वाचा:—आश्विन, हरिश्चंद्र, घनश्याम, आश्चर्य, विश्वामित्र, आश्लेषा, प्रश्नचिन्ह, रामेश्वर, निश्चय.

१ ईश्वराची शक्ति फार मोठी आहे.

२ ज्या दिशेस सूर्य मावळतो ती पश्चिम.

३ प्रश्नार्थक वाक्याचे शेवटीं प्रश्नचिन्ह करावें.

४ निश्चयावांचून आपलें काम सिद्धीस जाणार नाहीं.

५ शरीर निरोगी राहाण्यास शुद्ध हवा फार आवश्यक आहे.

६ समर्थांचा दासबोध व मनाचे श्लोक विशेष प्रसिद्ध आहेत.

७ काश्मीर येथें उत्तम शाली तयार होतात.

८ विक्रम संवताचा आरंभ कार्तिक शुद्ध १स होतो.

धडा पधरावा

## ष्

प्रथम ष् हें व्यंजन अर्धें म्हणजे ष्‌ असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

ष् + क = ष्क. पुष्कळ.

ष् + ट = ष्ट. गोष्ट.

ष् + ण = ष्ण. विष्णु.

ष् + प = ष्प. पुष्प. ष् + य = ष्य. धनुष्य.

वाचाः—कोष्टक, भीष्म, कृष्ण, ओष्ठ, मनुष्य, वैष्णव, बाष्प, कष्टसाध्य, उष्मा, दृष्ट, ( दृष्ट ).

१ प्रत्येक मनुष्यानें राजनिष्ठ असलें पाहिजे.

२ फुलांच्या माळेस पुष्पमाला म्हणतात.

३ कापसाचें पीक उष्ण प्रदेशांत होतें.

४ सर्व एकदळ धान्यामध्यें गहूं फार पौष्टिक आहे.

५ मनुष्याला विद्येच्या योगानें मोटेपणा आला आहे.

६ पाण्याचा पृष्ठभाग नेहमीं समपातळींत राहातो.

७ भीष्मानें पित्याच्या सुखाकरितां राज्यत्याग केला

८ गोकुळाष्टमीस कृष्णजन्माचा उत्सव होतो.

---

### प्रश्न.

१ च, ज, झ आणि ट ह्यांना 'य' हें अक्षर जोडून दाखवा.

२ ण, त, थ, ध, न आणि प हीं अक्षरें अर्धीं काढा.

३ पुढील अर्धीं अक्षरें ओळखाः—फ्, ठ्, भ्, म्, ट्, ^, ल्, ळ्.

धडा सोळावा.

## स्.

प्रथम स् हें व्यंजन अर्धें म्हणजे स असें काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

स् + क = स्क भास्कर.

स् + ट = स्ट. स्टेशन.

स् + त = स्त. पुस्तक.

स् + थ = स्थ. हिंदुस्थान. स् + न = स्न. स्नान.

वाचा—भस्म. दास्य. अस्वल. स्पंज. रस्ता. स्वार. संस्कृत. विस्तृत. सृष्टि. बृहस्पति. नमस्कार. गृहस्थ.

१ भास्कराचार्य नांवाचे प्रसिद्ध ज्योतिषि आपल्या देशांत होऊन गेले.

२ हिंदुस्थानच्या पश्चिमेस अरबी समुद्र आहे.

३ नशिबावर हवाला ठेवून स्वस्थ बसूं नये.

४ कृष्णपक्षाच्या शेवटच्या तिथीस अमावास्या म्हणतात.

५ नित्य स्नान केल्यानें शरीर निर्मळ राहातें.

६ संवयीनें स्मरणशक्ति वाढवितां येते.

७ पर्वतावरील हवा स्वच्छ व थंड असते.

---

१ ॅ, असलेले पांच शब्द लिहा.

२ क्ष ह्या जोडक्षरांत किती व कोणतीं अक्षरें आहेत.

३ ल, व, त आणि म जोडून होणारीं दोन दोन जोडाक्षरें लिहा.

धडा सतरावा.

## ह्

प्रथम ह् हें व्यंजन ह् असें काढून त्याचे खालचे भागास दुसरें जोडावें. जसें:—

**ह् + म = ह्म. ब्राह्मण. ह् + य = ह्य. वह्या.**

हीं जोडाक्षरें मराठींत वारंवार येतात. व पुढें दिलेलीं संस्कृत ग्रंथांत आढळतातः— **आह्निक. आह्लाद. अपराह्ण. जिह्वा.** इ. हीं जोडाक्षरें उच्चाराच्या सारखेपणामुळें कोठें कोठें अशींही लिहितातः— **आन्हिक, आल्हाद, अपराण्ह, जिव्हा इ.**

## ळ् आणि क्ष्.

हीं व्यंजनें अर्धीं ह्मणजे ळ आणि क्ष अशी काढून त्यापुढें दुसरें अक्षर जोडावें. जसें:—

**ळ् + य = ळ्य. गोळ्या**

**क्ष् + ण = क्ष्ण. तीक्ष्ण.**

**क्ष् + म = क्ष्म. लक्ष्मी.**

**क्ष् + य = क्ष्य. भक्ष्य.**

१ ब्रह्मदेशांतील लोकांस ब्रह्मी लोक म्हणतात.

२ फार मोठ्या व खोल तळ्यास सरोवर म्हणतात.

३ गवत व चिंध्या ह्यांच्यापासून कागद बनवितात.

४ मुक्या माणसांची दृष्टि फार तीक्ष्ण असते.

५ पक्ष्यांना पंख असतात

६ रामलक्ष्मणांनीं राक्षसांपासून यज्ञांचें रक्षण केलें.

७ ज्ञानदेव महाराजांनीं ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला.

(२१) ३०९

# धडा अठरावा.

## द्वित्त प्रकार.

ह्या प्रकारांत कांहीं अक्षरें एकापुढें एक लिहितात. जसें:—

| | |
|---|---|
| ख् + ख = ख्ख. सख्खा. | म् + म = म्म. झिम्मा. |
| ग् + ग = ग्ग. ढुग्गा. | य् + य = य्य. सय्यद् |
| ण् + ण = ण्ण अण्णा | व् + व = व्व. सव्वाशेर. |
| प् + प = प्प. थप्पड. | श् + श = श्श. हुश्श. |
| ब् + ब = ब्ब. बिब्बा. | स् + स = स्स. हिस्सा. |

कांहीं अक्षरें एकाखालीं एक लिहितात. जसें:—

ट् + ट = ट्ट. हट्ट.  ड् + ड = ड्ड. गड्डा.

ठ् + ठ = ठ्ठ. मठ्ठा.  ढ् + ढ = ढ्ढ बुढ्ढा

द् + द = द्द.

कांहीं अक्षरें दोन्हीं रीतींनीं लिहितात. जसें:—

क्क. [क्क] च्च. (च्च) ज्ज. [ज्ज] न्न. (न्न) ल्ल (ल्ल)
शिक्का. गच्ची. कज्जा. अन्न. किल्ला. त्+त=त्त हें निराळें काढतात.

१ आपल्या देशांतून पुष्कळ कच्चा माल बाहेर जातो.
२ सज्जनगडावर रामदास स्वामींची समाधि आहे.
३ आपण थट्टेंत देखील खोटें बोलूं नये.
४ शिवनेरी किल्ला पुण्याच्या थेट उत्तरेस आहे.
५ जगांत शेराला सव्वाशेर असतोच.
६ शेवटीं तो पतंग भर्रदिशीं वर गेला.

---

टीप-- रला 'र' हें अक्षर जोडतांना पहिल्या रची रेफ होतें व दुसरा र जशाचा तसा राहतो. जसें:— हर्र, चर्र, फुर्र, कुर्र इ.

धडा एकोणिसावा.

## तीन व चार अक्षरी जोडाक्षरें.

दोन अक्षरी जोडाक्षर अर्धें* काढून त्यास तिसरें अक्षर जोडावें, म्हणजे तीन अक्षरी जोडाक्षर तयार होतें. जसें:—

| | |
|---|---|
| क्त + य = क्त्य. युक्त्या | ट्ट + य = ट्ट्य. पट्ट्या. |
| त्र + य = त्र्य. छत्र्या. | त्त + य = त्त्य, कित्त्यावर |
| स्त + य = स्त्य. कुस्त्या. | भ्र + य = भ्र्य, अभ्र्याचा. |
| स्त + र = स्त्र. स्त्र शास्त्र | ष्ट + य = ष्ट्य, कोष्ट्यानें. |
| ल्ह + य = ल्ह्य. कोल्ह्यानें. | ष्ट + र = ष्ट्र, महाराष्ट्र. |
| न्ह + य = न्ह्य, तान्ह्या. | र्घ + य = र्घ्य, अर्घ्य. |
| त्स + य = त्स्य, मत्स्य | द्र + य = द्र्य, दारिद्र्य. |

सामर्थ्य आंग्र्यांनीं स्वास्थ्य महात्म्य गड्ड्या.

स्त्र + य = स्त्र्य. शास्त्र्यांचा. इन्फ्ल्युएंझा.

१ जिल्ह्याचे मुख्य अधिकाऱ्यास कलेक्टर म्हणतात.

२ तान्ह्या मुलांची वाढ नुसत्या दुधानें होतें.

३ आपल्याप्रमाणें कुत्र्याला घाम येत नाहीं.

४ हातच्या पुस्त्या कित्त्या बरहुकूम काढाव्या.

५ द्रुपद राजाच्या सभेंत अर्जुनानें मत्स्यवेध केला.

---

* १ दोन अक्षरी जोडाक्षरांतील दुसऱ्या अक्षराची उभी रेघ पुसल्यानें तें जोडाक्षर अर्धें होतें. जसें:—क्त, क्त, स्म, स्म, त्म, त्म इ.

२ एकाखालीं एक लिहून होणारें जोडाक्षर जसेंच्या तसें लिहून त्यापुढें तिसरें अक्षर जोडावें जसें:— ष्ट्य, ड्ड्य, ह्ल्य इ०

३ रेफ असलेलें अक्षर अर्धें काढून त्यापुढें तिसरें अक्षर जोडावें व रेफ त्यावर द्यावी. जसें:— र्घ, र्घ्य, र्त, र्त्य, र्क, र्क्य इ.

धडा विसावा.

जोडाक्षरांतील शेवटचें अक्षर क, ख, ग, इ० ह पर्यंत असलेला

## शब्दसंग्रह.

कः--धक्का [धक्का], षट्कोण, अर्क, वल्कल, भास्कर, चमत्कार, पुष्कळ. खः-- सख्खा, मूर्ख, अस्खलित. गः-- डग्गा, खड्ग, उद्गार, वर्ग, वल्गना. घ.--दीर्घ चः-- गच्ची, नेप्चून, खर्च, पश्चिम, लेक्चर. छः-- कच्छ. ज.-- कज्जा, अब्ज, कर्ज. झः-- अलेक्झांडर. टः-- डाक्टर, वाशिंग्टन, पट्टी, सप्टेंबर, कोर्ट, गोष्ट. ठः-- लठ्ठ, निष्ठा. डः-- गड्डा, कार्ड. ढः-- बुढ्ढा, णः-- अण्णा, रुग्णालय, सुवर्ण, कृष्ण, अपराह्णकाळ. तः-- भक्त[भक्त], कित्ता, आप्त[आप्त], वर्तन, शिस्त. थः-- उत्थापन, अर्थ, स्थान. दः-- मुद्दल, शब्द, गर्दी, धः-- युद्ध, अब्धि, अर्धा. नः-- लग्न (लग्न), विघ्न (विघ्न), यत्न [यत्न], अन्न, स्वप्न [स्वप्न], कर्नाटक, प्रश्न, स्नान, वह्नि. पः-- तत्पर, गप्पा, अर्पण, कल्पना, पुष्प, कस्पट. फः--फुप्फुस, बर्फ, स्फटिक, बः--सद्बुद्धि, बिब्बा, दुर्बळ, भः--भगवद्भक्त, दर्भ. मः-- रुक्मिणी, युग्म, आत्माराम, पद्मिनी, जन्म, धर्म, किल्मिष, काश्मीर, भीष्म, अकस्मात्, ब्राह्मण.

यः--खिडक्या, संख्या, मुंग्या, वाघ्या, वरच्या, भाज्या, माझ्या, पाट्या, काठ्या, गाड्या, पेंढ्या, बरण्या, तात्या, काथ्या, विद्या, संध्या, जुन्या, टोप्या, चाफ्याचा, तांब्या, उभ्या, म्यान, शय्या, सुऱ्या, सूर्य, पावल्या, व्याज, घनश्याम, धनुष्य, हास्य, वह्या, कळ्या, भक्ष्य.

रः-- चक्र, ख्रिस्त, संग्रह, व्याघ्र, वज्र, राष्ट्र, ड्रॉइंग, छत्री [छत्री], चंद्र, विप्र, फ्रान्स, ब्रीद, भ्रम, क्रिर्र, ताम्र, तीव्र, श्रम, सहस्त्र, हृ, ह्र. लः--क्लेश, इंग्लंड, प्लेग, आम्ल, कार्लै, किल्ला, आश्लेषा, आल्हाद. वः- ऋग्वेद, पक्वान्न, पक्वान्न श्वासोच्छ्वास, ज्वारी, खट्वांग, कण्व, सत्व, पृथ्वी, द्वारका, ध्वज, अन्वय, गर्व, बिल्व, सव्वा, ईश्वर, स्वार, जिह्वा. शः-- सुदर्शन, हुश्श. षः--साक्ष, हर्ष. सः--इन्कमटॅक्स, उत्साह, पेन्स, अप्सरा, फार्स, जेम्स, वेल्स, हिस्सा.

हः-- कण्हेरी, उन्हाळा, म्हातारा, तऱ्हा, ग्वाल्हेर, तेव्हां

---

ऋकार युक्त शब्दः--प्रकृति, गृहस्थ, घृतपात्र, जृंभा, (जांभई) तृषा, दृष्ट, धृतराष्ट्र, नृत्य, पृथ्वी, बृहस्पति, भृंग, मृग, नैर्ऋत्य, वृषभ, ऋष्यशृंग, सृष्टिज्ञान, हृषीकेश.

ध्यानांत ठेवण्यासारखीं जोडाक्षरें:-

**क्त, क्क, क्र, त्त, त्र, त्स, द्य, द्म, द्द, ह्य, ल्ह्य, ह्म, प्प, ण्ण, द्ध्य, ब्ध्य, ल्ल, ङ्ग, ह्र, ड्र, ड्र.**

# अनेक प्रकारचे शब्द.

महाराष्ट्र, धर्मराज, द्रौपदी, कौसल्या, लक्ष्मण, शत्रुघ्न, ब्रह्मदेव, संवत्सर, वक्तृत्व, वैश्वदेव, शुद्धलेखन, ज्येष्ठ, श्रीमंत, आर्द्रता, शब्दार्थ, शस्त्रास्त्रें, वृत्तदर्पण, सावित्री, रामशास्त्र्यांनीं, संपत्ति, मोतद्दार, जगद्गुरु, तेजःपुंज, अश्वत्थामा, शुश्रूषा, सूर्यप्रकाश, प्रतिध्वनि, निर्लज्ज, स्वातंत्र्य, मित्रत्व, विस्तृत, ईश्वरकृपा, ज्योतिःशास्त्र, राजसत्ता, जन्मभूमि, सर्वोत्कृष्ट, यत्किंचित्, इंद्रधनुष्य, पृथक्करण, दृढनिश्चय.

---

## उच्चाराविषयीं साधारण नियम.

१ पट्टा, कित्ता, मुद्दल, विद्या, सत्य, पत्र, पुष्प इ. जोडाक्षरयुक्त शब्द वाचतांना 'जोडाक्षराचे' मागील अक्षरावर थोडा जोर द्यावा लागतो.

२ घड्याळ, खट्याळ, उन्हाळा, कुऱ्हाड, तऱ्हा इत्यादि शब्दांत जोडाक्षराचे मागील अक्षरावर जोर द्यावा लागत नाहीं.

३ पाट्या, काठ्या, सुऱ्या, वड्या, सोन्याचा, घोड्यानें, गेल्यावर, धोब्याला, रव्याचा इ. अनेकवचन झालेल्या व सामान्यरूप झालेल्या जोडाक्षराचे मागील अक्षरावर जोर द्यावा लागत नाहीं.

टीपः— पट्टी, किल्ला, कित्ता इ. शब्दांचे अनेकवचन व सामान्यरूप होतांना जोडाक्षरामागील अक्षरावर जोर द्यावा लागतो. जसें:— पट्ट्या, किल्ल्या, कित्त्याचा, अड्ड्या इ.

# उलट सुलट जोडाक्षरांचे शब्द.

अर्क, चक्र; मूर्ख, ख्रिस्त; मार्ग, ग्रहण; दीर्घ, व्याघ्र; आर्जव, वज्र; कोर्ट, ट्रंक; गार्ड, ड्रम; कर्ता, पत्रा; गर्दी, मुद्रा; स्पर्धा, आंध्र; अर्पण, प्रयोजन; बर्फ, फ्रान्स; दुर्बळ, ब्रह्मदेश; दुर्भाग्य, अभ्रक; निर्मळ, नम्र; सर्वत्र, व्रात्य; दर्शन, आश्रम; फार्स, सहस्त्र; गर्हणीय, ह्रास, ह्लास; मक्का, सत्कार; क्लेश, वल्कल; साक्ष, शुष्क; इंग्लंड, फाल्गुन; षट्कोण, आक्टोबर; षट्पाद, सप्टेंबर; उत्पन्न, समाप्त; शब्द, सद्बुद्धि; जन्म, महिम्न; पेन्सल, स्नान; पन्हाळा, वह्नि; प्लासी, कल्पना, अप्सरा, कस्पट; म्लेंच्छ, गुल्म; ब्रह्मदेव, म्हणून; जिल्हा, आह्लाद; तेव्हां, जिह्वा; विस्तव, मत्सर.

## पुढील प्रत्येक शब्द उलट वाचला तरी मूळ शब्दच बनतो.

कनक, कडक, कटक्क, कलंक, कळक, कणीक, कारिका, गदग, गणंग, जहाज, तव्यंत, नमन, नयन, नवीन, नर्तन, मलम, रबर, वाहवा, वाजवा, समास, सर्वांस, सर्कस, सरास, काका, दादा, नाना, बाबा, मामा.

## पुढील शब्द उलट वाचल्यास, दुसरा शब्द तयार होतो.

वात, सर, राम, खरा, राग, दास, हार, वार, फड, डाव, मार.

## ऱ्हस्व आणि दीर्घ.

# इ. ि.

इ ह्या स्वराचा आणि त्याची खूण जोडून होणाऱ्या अक्षरांचा उच्चार+ ऱ्हस्व [ आंखूड ] करावा. जसें:-

१ इच्छा, इजा, किडा, खिसा, गिड्डा, चिमा, जिना, टिळा, डिंक, दिवा, निळा, पिळा, बिघा, भिंत, मित्र, लिंब, विडा, शिळा, हिरा.

२ इनाम, इजार, किरण, खिंडार, गिधाड, घिरट, चिखल, जिन्नस, टिळक, तिसरा, थिल्लर, दिवस, निशाण, पिसारा, फिरस्ता, बिऱ्हाड, भिडस्त, मिरज, रिकामा, लिलांव, विमान, शिकार, सिमला, हिरडा.

३ इमारत, किनखाब, खिलापत, गिरगांव, चिंचवड, तिरंदाज, दिगंबर, निरक्षर, बिरबल, भिकंभट, मिठागर, रियासत, लिंगायत, विनायक, शिवराम, हिमालय.

४ अंकित, खचित, खजिना, स्फटिक, पंडित, गणित, मंदिर, अधिक, दैनिक, कपिला, सुमित्रा, चरित्र, अलिप्त, कविता, मासिक, महिना, संक्षिप्त.

---

+ हा आणि ह्या पुढील उच्चार शिक्षकांनीं एक दोन वेळ करून दाखवावे.

# ई. ी.

ई ह्या स्वराचा आणि त्याची खूण जोडून होणाऱ्या अक्षरांचा उच्चार दीर्घ [ लांब ] करावा. जसें:---

१ ईड. ईश. कीड. खीर. गीत. चीट. जीव. झीट. टीच. ठीक. ढीग. तीळ. दीर. धीट. नीच. पीठ. फीर. बीज. भीम. मीठ. रीत. लीला. वीज. शीट. सीता. हीग. क्षीर.

२ शाई. आई. बाई. वाई. काकी. बगी. चंची. भाजी. पाटी. काठी. माडी. मेंढी. पाणी. चाती. मेथी. वादी. मनी. पापी. माफी. डबी. स्वामी. झारी. वाली. चावी. काशी. दासी. वही. माळी. पक्षी. राज्ञी. ( राणी )

३ समई. कढई. सरकी. पालखी. बरची. करंजी. कवटी. मराठी. कानडी. बरणी. सोबती. आनंदी. पारधी. जननी. बरफी. पंजाबी. पायरी. चवली. थोरवी. मावशी. राक्षसी. आरोळी.

४ ताईत. वाईट. पाकीट. नागीण. वाघीण. खंजीर. पाटील. कठीण. वडील. कणीस. कथील. कंदील. खंबीर. गंभीर. जमीन. परीक्षा. तालीम. नवीन. नाशीक. शाहीर. माळीण. बक्षीस.

## उ. ु.

उ ह्या स्वराचा आणि त्याची खूण जोडून होणाऱ्या अक्षरांचा उच्चार ऱ्हस्व [ आंखूड ] करावा. जसें:-

१ उंट. कुंड. खुळा. गुंज. चुना. जुना. झुंज. तुरा. दुवा. धुंद. पुडा. फुगा. बुवा. मुळा. युद्ध. रुपें. लुला. शुद्ध. सुख. हुंडा. क्षुधा.

२ उंबर. कुऱ्हाड. खुरपें. गुलाब. घुमट. चुलता. जुगार. झुबला. डुकर. तुळस. दुपार. पुरण. फुटाणे. बुडखा. भुयार. मुलगा. रुमाल. लुगडें. सुतार. हुरडा. क्षुल्लक.

३ कुरापत. गुजराथ. चुनखडा. जुनागड. तुकाराम. दुराचार. धुळवड. नुकसान. पुरंदर. बुधवार. भुसावळ. मुखवटा. युवराज. रुखवत. शुक्रवार. सुभेदार. हुकमत. क्षुधाक्रांत. कुंभारवाडा. तुलनात्मक. दुमालदार. पुस्तकालय. भुदरगड. मुसलमान. रुद्रावतार. शुद्धलेखन. हुंडणावळ.

## ऊ. ू.

ऊ ह्या स्वराचा आणि त्याची खूण जोडून होणाऱ्या अक्षरांचा उच्चार दीर्घ [लांब] करावा. जसें:-

१ ऊठ, ऊद, ऊंस, कूळ, खूप, गूळ, घूस, चूक, जून, झूज, डूल, तूप, दूध, धूर, पूल, फूल, बूट,

भूत, मूल, रूळ, लूट, शूर, सूड हूड.

२ भाऊ, काकू, सखू, गंगू, राघू, काजू, तट्टू, लाडू, वेणू, नातू, सदू, जनू, बापू, अफू, बाबू, संभू रामू, मोरू, शालू, वासू, गहूं, बाळू.

३ तेलगू, तराजू, करडूं, परभू, वांसरूं, परसूं, दयाळू,

४ दऊत, लांकूड, रंगून, अजून, बेडूक, गढूळ, माणूस, बंदूक, कापूस, कबूल, मामून, वसूल, माहूत, वाळूक.

# अनेक तऱ्हेचे शब्द.

१ किल्ली, खिटी, चिनी, दिल्ली, निरी, पिठी, मिरीं,

२ किडकी, खिडकी, गिरणी, घिसाडी, चिमणी, जिजाई, टिपरी, ठिणगी, तिसरी, दिवाळी, धिटाई, पिंजारी, बिजली, भिकारी, मिरची, रिकामी, विषारी, शिवाजी, हिरोजी.

३ कुणबी, खुशाली, गुराखी, चुलती, जुलमी, झुकांडी, तुरटी, दुसरी, पुतळी, भुसारी, मुलगी, रुकडी, लुगडीं, सुपारी.

४ शंकु, धेनु, भानु, वायु, पशु, रिपु, विष्णु, आकृति, अतिथि, अग्नि, उत्पत्ति, ऋषि, कवि, कीर्ति. छत्र-

...समग्र वाचून पाहिली. सदर पुस्तकांत मुलांना अवघड व त्रासदाय वाटणाऱ्या ह्या विषयाची मांडणी अत्यंत सुलभपणें केल्यामुळें तें फारच चां... झालें आहे. सदर पुस्तकाचा विद्यार्थी व शिक्षक ह्यांना सारखाच उपयोग होण्या... सारखा असून, त्याचा सार्वत्रिक उपयोग केल्यास प्राथमिक शिक्षणक्रमातील इतर ...यांप्रमाणें याही महत्वाच्या पोटविषयाचें शिक्षण सुसंबद्ध आणि व्यवस्थित ...नें देण्याच्याकामीं हें पुस्तक चांगलेंच मार्गदर्शक होईल, यांत शंका नाहीं.

...श्वर ता. ११।५।२५ } B. R. KULKARNI. M. A.

मि० कुलकर्णी यांनीं लिहिलेल्या 'जोडाक्षरमार्गप्रदीप' नांवाच्या पुस्तकाची ...तलिखित प्रत वाचून पाहिली. लहान मुलांना शिक्षकाच्या मदतीनें सदर पुस्तकाचा चांगला उपयोग होऊन, शिवाय त्याचा वरील ईयत्तांतील विद्यार्थ्यांसही ...राच फायदा होईल.

तारीख ८।३।२५. } D. R. BHONSLE.
कोल्हापूर. } ए. इन्स्पेक्टर, इ० करवीर.

मि. कुलकर्णी यांचें ' जोडाक्षरमार्गप्रदीप ' हें पुस्तक वाचून पाहिलें. पुस्तक सुबोध व पद्धतशीर झालें असून, त्याचा बालविद्यार्थ्यांस चांगलाच उपयोग होईल असा भरंवसा आहे. युनिव्हर्सिटींत मराठी भाषेस आतां बरेंच उच्चस्थान मिळालें असून, उत्तरोत्तर तिचा उत्कर्ष जास्त होईल; अशी सुचिन्हें दिसत आहेत. भाषेच्या वाढीला लिपी शास्त्रशुद्ध असणें जरूर आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांची स्थिति पाहिली तर लिपीचें पूर्ण अज्ञान दिसून येतें. अशावेळीं जोडाक्षरमार्गप्रदीप जन्मास येत आहे, हें सुचिन्ह आहे. सदर पुस्तकास पालक व शिक्षक यांनीं उदार आश्रय देणें जरूर आहे, व तसा ते देतील अशी उमेद आहे.

तारीख ६।८।२५. } K. G. SABNIS, B. A.
कोल्हापूर. } सेक्रेटरी, नि. श्रीमंत हिंमतबहाद्दरसाहेब.

रा. कुलकर्णी यांनीं लिहिलेलें ' जोडाक्षरमार्गप्रदीप ' हें पुस्तक वाचून पाहिलें. अलीकडे बरेच विद्यार्थी जोडाक्षरें लिहितांना चुकतात, उच्चार करण्यास अडखळतात व भलताच उच्चार करतात, असें बरेंच अनुभवास येतें. सदर पुस्तकाचा उपयोग केल्यानें ही अडचण खास दूर होईल.

तारीख } एस्. डी. चिकोडीकर.
१।६।२५ कोल्हापूर } हेडमास्तर, नूतन मराठी विद्यालय कोल्हापूर.

अनुस्वाराचं मूळरूप म् हें आहे. लिहिण्याच्या ...
...च्या माथ्यावर ( ं ) ह्या खुणेनें दाखवितात. जसें— अं, इं, उं, कं, खं, इ.

२ अनुस्वाराचा उच्चार त्यापुढें असणाऱ्या अक्षराच्या वर्गातील शेवटच्या अक्षराप्रमाणें ( अनुनासिकाप्रमाणें ) होतो. जसें:—

अंक, पंखा, गंगा, संघ इ. अशा शब्दांत अनुस्वाराचा उच्चार ङ् प्रमाणें होतो.

कंचुकि, लांछन, अंजन, वांझ " " " " ञ् " "

घंटा, कंठ, बंड, पांढरा ,, ,, ,, ,, ण् " "

संत, पंथ, मंद, अंध ,, ,, " ,, न् " "

संप, गुंफा, आंबा, दंभ " " " ,, म् " "

*म्हणून हे शब्द [संस्कृत ग्रंथांत आणि अलीकडे मराठींतही कोठें कोठें] असेंही लिहितात. जसें:— शङ्कर, पङ्खा, गङ्गा, सङ्घ, कञ्चुकि, लाञ्छन, अञ्जन, वाञ्झ, घण्टा, कण्ठ, बण्ड, पाण्ढरा, पन्थ, मन्द, अन्ध, सम्प, गुम्फा, आम्बा, दम्भ इ०

संरक्षण, संशय, दंष्ट्रा, हंस, सिंह, इ. शब्दांत अनुस्वाराबरोबर व् चा उच्चार होतो. [हे शब्द लिहितांना बऱ्याच चुका होतात, तिकडे लक्ष देण्याबद्दल पृ. ३ मध्यें सांगितलें आहे. ]

४ संलग्न आणि संयमन ह्या सारख्या शब्दांतील अनुस्वाराच्या उच्चाराबरोबर पुढील अक्षराचाही उच्चार होतो. जसें—सँल्लग्न, सँय्यमन इ.

५ मराठींत बऱ्याचशा शब्दांतील अनुस्वाराचा उच्चार नि २ प्रमाणें स्पष्ट न होतां केवळ नाकांतूनच होतो. जसें.—हें, तें, जें, कोठें, नांव इ.

## अनुस्वारयुक्त शब्द.

पुढें, मागें, येथें, तेथें, जेथें, कोठें, कधीं, परवां, यंदां, पेक्षां, सुद्धां, खालीं, ( एकदां, दोनदां इ. ) शेंकडों, हजारों, लाखों, खदखदां, ( करणें, बोलणें, इ. ) तूं, त्वां, म्यां, ( तळें, सोनें, रुपें इ. ) नाहीं, केव्हां, ( एकशें, दोनशें इ. ) जेव्हां, तेव्हां, गांव, गहूं, किंवा, कां, कींव, ऊंस, कांकण, गांठ, दांत, लांकूड, लोंकर, झोंप, पांच, पांखरूं, वांसरूं, कांहीं,

( समाप्त )